# मंत्रिमंडळ निर्णय

## २४ फेब्रुवारी २०१५

## ( मंत्रिमंडळ बैठक क्र.१७ )

| क्र. | विषय | विभाग |
| --- | --- | --- |
| १ | राज्यात साडेसात हजार सौर कृषि पंप वितरीत करणार | ऊर्जा |
| २ | राज्य कामगार विमा योजनेतील वैद्यकीय अधिकाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार ३५ टक्के व्यवसायरोध भत्ता | सार्वजनिक आरोग्य |
| ३ | प्रभारी कुलगुरू पदाचा कार्यकाळ १२ ऐवजी १८ महिने करण्याचा निर्णय | उच्च व तंत्रशिक्षण |
| ४ | जिल्हा न्यायालयांची आर्थिक अपील अधिकारिता एक कोटी रूपये करण्याचा निर्णय | विधी व न्याय |
| ५ | माजी उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांना मंत्रिमंडळाची श्रद्धांजली | -- |

## राज्यात साडेसात हजार सौर कृषि पंप वितरीत करणार

शेतकऱ्यांना सौर कृषि पंप वितरीत करण्याची केंद्र शासनाची योजना राज्यात पथदर्शी प्रकल्प म्हणून राबविण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार राज्यात ७ हजार ५४० सौरऊर्जा पंपाचे वितरण करण्यात येणार आहे. यासाठी सुमारे ४४५ कोटी रूपये खर्च अपेक्षित आहे. हे धोरण राबविण्यासाठी राज्याच्या हिश्याची पाच टक्के रक्कम २२ कोटी २५ लाख रूपये हरित ऊर्जा निधीमधून देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

राज्यात बहुतांश वीज निर्मिती औष्णिक पद्धतीने होत असल्यामुळे वायू प्रदुषणात भर पडत आहे. औष्णिक वीज निर्मितीसाठी लागणारी खनिज संपत्ती मर्यादित प्रमाणात आहे. तसेच औष्णिक पद्धतीच्या वीज निर्मितीमुळे पर्यावरणाचा ऱ्हासही होत आहे. अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत शाश्वत व निरंतर स्वरुपाचा आहे. त्या दृष्टीकोनातून कृषि पंपासाठी सौरऊर्जेचा वापर महत्वाचा ठरणार आहे. राज्यात शेतीसाठी लागणाऱ्या विजेचे प्रमाण खूप मोठे आहे. शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्यात येतो, तसेच अनुदानही देण्यात येते. औष्णिक विजेवरील शेतीपंपाचा भार कमी करण्यासाठी केंद्र शासनातर्फे राष्ट्रीय स्तरावर १ लाख सौर कृषिपंप वाटप करण्यात येणार आहेत. या योजनेसाठी ४०० कोटी तरतूद केली आहे. सुरुवातीला या योजनेंतर्गत राज्यासाठी ४ हजार ६०० सौर कृषिपंप वाटप करण्याचे उद्दिष्ट होते. राज्य शासनाच्या विनंतीनुसार केंद्र शासनाने ७ हजार ५४० सौर कृषिपंपांचे सुधारित उद्दिष्ट दिले आहे. ही योजना राज्यात पथदर्शी प्रकल्प म्हणून राबविण्याचा निर्णय आज घेण्यात आला.

जलसिंचनासाठी जमिनीचे क्षेत्र ५ एकरपेक्षा कमी असणारे आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील शेतकरी, धडक सिंचन योजनेअंतर्गत विहिरींचा लाभ घेतलेले शेतकरी, अति दुर्गम भागांतील शेतकरी, पारंपरिक पद्धतीने विद्युतीकरण न झालेल्या, वन कायद्याच्या अटींमुळे आणि तांत्रिक अडचणींमुळे विद्युतीकरण होऊ शकले नाही अशा भागातील शेतकरी या योजनेचा लाभ घेऊ शकतील. या शेतकऱ्यांना विहीर, कुपनलिका, शेततळे, गावतळे आणि पाण्याची पातळीनुसार तांत्रिक सर्वेक्षण करून सबमर्सिबल किंवा भूपृष्ठावरील सौर कृषिपंप देण्यात येणार आहे.

या योजनेची अंमलबजावणी महावितरणमार्फत करण्यात येईल. तसेच, महाऊर्जामार्फत तांत्रिक सहाय्य देण्यात येईल. कृषि विभाग, ऊर्जा विभाग, जिल्हा परिषद आणि जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत पात्र लाभार्थी निवडणे आणि प्राथम्यक्रम ठरविण्यात येणार आहे.

केंद्र शासनाने निश्चित केलेल्या किमान तांत्रिक परिमाणानुसार हे सौर कृषिपंप राहणार आहेत. या पंपांचे पुरवठादार ई-टेंडरींग पद्धतीने निश्चित करण्यात येणार आहेत. सौर कृषिपंपाची किंमत विचारात घेता लाभार्थी हिस्सा केवळ ५ टक्के ठेवण्यात आला आहे.

-----०-----

सार्वजनिक आरोग्य विभाग

## राज्य कामगार विमा योजनेतील वैद्यकीय अधिकाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार ३५ टक्के व्यवसायरोध भत्ता

राज्य कामगार विमा योजनेतील वैद्यकीय अधिकाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीनुसार ३५ टक्के व्यवसायरोध भत्ता १ जुलै २०१२ पासून पूर्वलक्षी प्रभावाने मंजूर करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आरोग्य सेवा संचालनालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीनुसार ३५ टक्के व्यवसायरोध भत्ता यापूर्वीच मंजूर करण्यात आला आहे. यासाठी एकूण तीन कोटी सत्तेचाळीस लाख रुपये इतका आर्थिक भार पडणार आहे. कामगार विमा योजनेवर होणारा खर्च केंद्र आणि राज्य शासन यांच्यात ७:१ या प्रमाणात विभागला जातो. या निर्णयामुळे सुमारे ४४ लाख रूपये इतका आर्थिक भार राज्य शासनावर पडणार आहे.

-----०-----

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

## प्रभारी कुलगुरू पदाचा कार्यकाळ १२ ऐवजी १८ महिने करण्याचा निर्णय

राज्यातील विद्यापीठाच्या कुलगुरूंचे पद रिक्त झाल्यानंतर प्रभारी कुलगुरू पदाचा कार्यकाळ १२ ऐवजी १८ महिने करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियमानुसार विद्यापीठाच्या कुलगुरूचे पद रिक्त झाल्यापासून १२ महिन्यांसाठी प्रभारी कुलगुरूंची नियुक्ती करण्यात येत होती.  अधिनियमात दुरुस्ती केल्यामुळे हा कालावधी आता १२ महिन्यांवरुन १८ महिन्यांपर्यंत वाढविण्यात आला आहे.

गोंडवाना विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. विजय ऐंचवार निवृत्त झाल्यामुळे त्यांच्या जागी प्रभारी कुलगुरूंची नियुक्ती करण्यात आली होती. प्रभारी कुलगुरूंची मुदत ५ मार्च २०१५ रोजी संपणार आहे. नवीन कुलगुरुंची नियुक्ती करण्यासाठी शोध समिती गठित करण्यासाठी शासनाच्या प्रतिनिधीचे नाव राज्यपालांना कळविण्यात आले आहेत. मात्र, गोंडवाना विद्यापीठाच्या पहिल्या व्यवस्थापन परिषद आणि विद्यापरिषदेची स्थापना अद्याप झालेली नसल्यामुळे शोध समिती गठित होणे, त्याद्वारे कुलगुरूंच्या नियुक्तीकरिता उमेदवारांची नावे मागविणे आणि छाननीद्वारे कुलगुरुंच्या नियुक्तीची कार्यवाही मार्चपूर्वी होणे शक्य नाही. हा पेच सोडविण्यासाठी हा  निर्णय घेण्यात आला आहे.

-----०-----

## जिल्हा न्यायालयांची आर्थिक अपील अधिकारिता एक कोटी रूपये करण्याचा निर्णय

जिल्हा न्यायालयात आर्थिक अपील करण्याची मर्यादा दहा लाख रूपयांवरून एक कोटी रूपये करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

न्यायालयात सादर होणारे दावे सामान्य जनतेच्या आवाक्यात असावेत याकरिता जिल्हा न्यायालयांची आर्थिक अपील अधिकारिता (Pecuniary Appellate Jurisdiction) वाढविणे गरजेचे होते. यासाठी हा निर्णय घेण्यात आला.

उच्च न्यायालय आणि राज्यातील न्यायालयांमध्ये वाढत असलेल्या थकित प्रकरणांच्या प्रश्नांवर उपाययोजना करण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण आहे. जिल्हा न्यायालयाची आर्थिक अपील अधिकारिता दहा लाख रूपये असल्यामुळे या मर्यादेपुढील दाव्यांसाठी नागरिकांना थेट उच्च न्यायालयात अपील करावे लागत होते. परिणामी उच्च न्यायालयांमध्ये दाखल होणाऱ्या प्रकरणांची संख्या वाढती होती. ही संख्या कमी करण्यासाठी जिल्हा न्यायालयांची अधिकारिता वाढविण्यात यावी, अशी मागणीही राज्य शासनाने केंद्राकडे केली होती. या निर्णयामुळे एक कोटी रुपयांपर्यंतच्या दाव्यांबाबत जिल्हा न्यायालयात अपिल दाखल करता येणार असल्याकारणाने जनतेला जिल्हा स्तरावर न्याय मिळण्यास मदत होईल.

-----o-----

## माजी उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांना मंत्रिमंडळाची श्रद्धांजली

माजी उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रावसाहेब रामराव ऊर्फ आर आर (आबा) पाटील यांना आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत श्रध्दाजंली वाहण्यात आली.

श्री. पाटील यांनी ग्रामविकासमंत्री म्हणून राबविलेल्या संत गाडगेबाबा अभियानासारख्या उपक्रमांनी ग्रामीण महाराष्ट्रात स्वच्छतेचा संस्कार रुजविला. त्यासोबत गृहमंत्री म्हणून डान्स बार बंदीच्या निर्णयातून त्यांनी समाजाचे हित जोपासले. तसेच तंटामुक्ती अभियानाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील समाजजीवनात बंधुभाव निर्माण करण्याचा त्यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केला. त्यांच्या निधनाने एक जाणिवेचा लोकप्रतिनिधी, उत्तम वक्ता, अभ्यासू नेता आणि उत्कृष्ट संसदपटू गमावल्याचे मंत्रिमंडळाच्या ठरावात म्हटले आहे.

-----o-----